## L. C. BILL No. I OF 2021.

A BILL

TO PROVIDE FOR PROHIBITION FOR USING PHOTOGRAPHS AND NAMES OF DEITIES, SAINTS, MAHATMAS, NATIONAL LEADERS GIVEN TO BEER BARS, PERMIT ROOMS, COUNTRY AND FOREIGN LIQUOR OUTLETS, HOTELS, RESTAURANTS ON THEIR NAME PLATES IN THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १.

**महाराष्ट्र राज्यातील बिअर बार, परमिट रुम, देशी व विदेशी दारू विक्री केंद्र, हॉटेल्स, उपाहारगृह यांच्या नामफलकावर त्यांना देण्यात आलेल्या देवदेवता, संत, महात्मे, राष्ट्रपुरुष यांच्या नावांचा व छायाचित्रांचा वापर करण्यास प्रतिबंध करणेसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात बिअर बार, परमिट रुम, देशी व विदेशी दारु विक्री केंद्र, हॉटेल्स, उपाहारगृह यांच्या नामफलकावर त्यांना देण्यात आलेल्या देवदेवता, संत, महात्मे, राष्ट्रपुरुष यांच्या नावांचा व छायाचित्रांचा वापर केल्यामुळे होणाऱ्या विटंबनावर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिनियम करणे इष्ट आहे. **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

(शा.म.मु.) एचबी १६३८-१ (२००—१२-२०२१)

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमाला महाराष्ट्र देवदेवता, संत, महात्मे, राष्ट्रपुरुष यांच्या नावांचा व छायाचित्रांचा वापर बिअर बार, परमिट रुम, देशी व विदेशी दारु विक्री केंद्र, हॉटेल्स, उपाहारगृह यांच्या नावाच्या फलकावर करण्यास प्रतिबंध करणे अधिनियम, २०२१ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नमूद करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " देवदेवता, संत, महात्मे, राष्ट्रपुरुष " म्हणजे प्रत्येक धर्मात आपआपल्या प्रथेप्रमाणे धार्मिक व इतर श्रद्धास्थाने ;

(ख) " विटंबना " म्हणजे देवदेवता, संत, महात्मे, राष्ट्रपुरुष यांची नावे किंवा छायाचित्र बिअर बार, परमिट रुम, देशी व विदेशी दारु विक्री केंद्र, हॉटेल्स, उपाहारगृह यांच्या नावाच्या फलकावर वापरण्याबाबत केलेली कृती ;

(ग) " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ड) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे.

हा अधिनियम कोणत्या व्यक्तींना लागू होईल.

**३.** राज्यातील बिअर बार, परमिट रुम, देशी व विदेशी दारु विक्री केंद्र, हॉटेल्स, उपाहारगृह यांच्या नावाच्या फलकावर, त्यांना देण्यात आलेली देवदेवता, संत, महात्मे, राष्ट्रपुरुष यांची नावे व छायाचित्र लावण्याची कृती या कलमाद्वारे गुन्हा ठरविण्यात येईल. तसेच याबाबत जबाबदार व्यक्तींविरुद्ध कलम ४ अन्वये कारवाई करण्यात येईल.

शास्ती.

**४.** या अधिनियमात नमूद गुन्ह्यात आरोप सिद्ध झाल्यास आरोपीस १ वर्ष सश्रम कारावासाची किंवा / आणि रुपये १ लाख इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येईल.

नियम करण्याचे अधिकार.

**५.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा यथास्थिती मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राह्यतेस बाध येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

देवदेवता, संत, महात्मे आणि राष्ट्रपुरुष ही राज्यातील जनतेची धार्मिक व इतर श्रद्धास्थाने आहेत. परंतु राज्यातील अनेक बिअर बार, परमिट रुम, देशी व विदेशी दारु विक्री केंद्र, हॉटेल्स, उपाहारगृह यांच्या नावाच्या फलकावर त्यांना देण्यात आलेल्या देवदेवता, संत, महात्मे आणि राष्ट्रपुरुष यांच्या नावांचा व छायाचित्रांचा वापर करुन विटंबना केली जाते. त्यामुळे राज्यातील जनतेच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात व राज्यातील सामाजिक वातावरण दुषित होते. जनतेला आकर्षित करण्यासाठी अशी कृती केली जाते व त्यायोगे जलद पैसा कमवण्याचे काम केले जाते. लोकशाही व्यवस्थेत कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा कोणालाही अधिकार नाही. त्यामुळे अशा कृतींना पायाबंद घालण्याची आवश्यकता आहे. यावर आळा घालण्यासाठी व या प्रकाराची दखल घेऊन जबाबदार व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे व सदर प्रकारावर बंधने आणण्याची आवश्यकता आहे.

वरील उद्देश साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक १३ नोव्हेंबर २०२०.

**डॉ. मनिषा कायंदे,**
प्रभारी सदस्या.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १(३)**.— या खंडान्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५(१)**.—या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

वर उल्लेखिलेले सर्व प्रस्ताव हे सामान्य स्वरुपाचे आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १.]**

**[ महाराष्ट्र राज्यातील बिअर बार, परमिट रुम, देशी व विदेशी दारू विक्री केंद्र, हॉटेल्स, उपाहारगृह यांच्या नामफलकावर त्यांना देण्यात आलेल्या देवदेवता, संत, महात्मे, राष्ट्रपुरुष यांच्या नावांचा व छायाचित्रांचा वापर करण्यास प्रतिबंध करणेसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[डॉ. मनिषा कायंदे,**
प्रभारी सदस्या.]

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई